पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २१३**
(सभावृत्तांत)

**दिनांक – १०/०३/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **१०/०३/२०२१** रोजी **दुपारी २.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.भालेकर प्रविण महादेव
१४. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१५. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.विकास ढाकणे –अति.आयुक्त (१), मा.अजित पवार - अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.राय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे – प्र.सह शहर अभियंता, मा.बोदडे, मा.आगळे, मा.दांगट – सहाय्यक आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पाटील – प्राचार्य, औ.प्र.कैंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.देखमुख, मा.वाघुंडे, मा.काळे, मा.धुमाळ, मा.शिंदे – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकीय अधिकारी, मा.बहुरे, मा.देशमुख, मा.पानसरे, मा.तायडे – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.गायकवाड –

जनता संपर्क अधिकारी, मा.जरांडे – मुख्य सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे – सहा. आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी उपस्थित होते.

----------

अ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२१० दि.२२/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२११ दि.२६/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२१२ दि.०५/०३/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ८९३८ विषय क्रमांक – ०१

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ - मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.मसाभां/५/कावि/१३३/२०२१, दि.०८/०२/२०२१

विषय – ऑटो क्लस्टर (DCH) संचालित स्पर्श हॉस्पिटल यांचे अतिरिक्त मनुष्य बळाबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार दिनांक २४/०३/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८९३९ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – ग क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ - मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.गक्षेका/आ/४/कावि/१६७/२०२१ दि.२६/०२/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातंर्गत ग क्षेत्रीय कार्यालयातील कार्यक्षेत्रामध्ये फॉगिंग मशिन रिक्षा टेम्पोमध्ये ठेवून औष्णिक धुरीकरण करणेसाठी ग क्षेत्रीय कार्यालयामार्फत निविदा नोटीस क्र.२/२०१९-२०२० दिनांक १३/१२/२०१९ रोजी र.रु.८,४८,६४०/- ची निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार मे.संत फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि. या संस्थेने एकुण रक्कमेच्या ११.९०% कमी दर सादर केलेने L1 म्हणून या संस्थेला क्र.गक्षेका/आ/४/कावि/२०४/२०२० दि.२०/०३/२०२० अन्वये दि.२३/०३/२०२० ते २२/०३/२०२१ अखेर कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.२२/०३/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे. सदर कामाची नविन निविदा प्रसिध्दीची कार्यवाही क्षेत्रीय कार्यालय स्तरावर चालु करणेत आलेली आहे. परंतु सदर कामाच्या निविदेस विलंब होण्याची शक्यता आहे, तसेच सदरचे काम हे अत्यावश्यक सेवेचे असल्याने मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तरी औष्णिक धुरीकरणासाठी वाहने भाड्याने घेणेसाठी, दि.२३/०३/२०२१ ते २२/०६/२०२१ अखेर (३ महिने) अथवा नविन निविदा कार्यवाही पूर्ण होऊन आदेश देईपर्यंत, या दोन्ही पैकी जे प्रथम होईल तोपर्यंत, मे.संत फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि. यांची ठेकेदार म्हणून नेमणूक करणेस व त्यासाठी येणा-या

अंदाजीत पूर्णांकीत खर्च र.रु.२,१३,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख तेरा हजार फक्त) इतक्या रक्कमेस व सदरची रक्कम ग क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागाकडील "धुरीकरणासाठी वाहने भाड्याने घेणे" या लेखाशिर्षावर टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४० | विषय क्रमांक – ०३
दिनांक – १०/०३/२०२१ | विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.सुरेश भोईर | अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ - मा.महापालिका आयुक्तत यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/३२/२०२१ दि.१२/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्तत यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेतील प्रभाग क्र.१४ टेल्को कुपर परिसरातील रस्ते कॉंक्रिटीकरण व सुधारणा करणेसाठी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सबब, सदर कामास प्रकल्प सल्लागार म्हणून मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांनी १.९५% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणुन मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची नियुक्ती केलेली आहे. सदर कामांसाठी मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.४५% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.९५% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४१ | विषय क्रमांक – ०४
दिनांक – १०/०३/२०२१ | विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.शत्रुघ्न काटे | अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.महापालिका आयुक्तत यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/३३/२०२१ दि.१२/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्तत यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेतील प्रभाग क्र.१४ मोहननगर, काळभोरनगर डी-३/डी-१ ब्लॉक व परिसरातील रस्त्याचे आवश्यकतेनुसार मजबुतीकरण व सुधारणा करणेसाठी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सबब, सदर कामास प्रकल्प सल्लागार म्हणून मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांनी १.९९% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणुन मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची नियुक्ती केलेली आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता सदर कामांसाठी मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.४९% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.९९% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४२ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ -मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/स्था/५५६/२०२० दि.२४/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेतील प्रभाग क्र.३० दापोडी सुंदरबाग येथे अद्यावत पध्दतीने रस्ता विकसित करणेसाठी मा. नगरसदस्य यांची मागणी आहे. सबब, सदर कामास प्रकल्प सल्लागार म्हणून मे. नेक्सस टेक्नो कन्सल्टंट्स यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची दरसूची दि.२१/१२/२०२० ते दि.२४/१२/२०२० रोजी मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंट्स यांनी १.७०% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर कामांसाठी मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंट्स यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.२०% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.७०% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४३ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ -मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/स्था/५५५/२०२० दि.२४/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेतील दापोडी येथील पवना नदीच्या समांतर असलेला १२ मी. रस्ता विकसीत करणेसाठी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सबब, सदर कामास प्रकल्प सल्लागार म्हणून मे. नेक्सस टेक्नो कन्सल्टंट्स यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची दरसूची दि.२१/१२/२०२० ते दि.२४/१२/२०२० रोजी मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंट्स यांनी १.७२% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर कामांसाठी मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंट्स यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.२२% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.७२% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४४ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – वायसीएमएच

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ - मा.अति. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.YCMH/७/कावि/५६/२०२१ दि.२६/०२/२०२१

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय आयुर्विज्ञान परिषद, दिल्ली यांच्या किमान मार्गदर्शक मानंकानुसार[MSR 50]

प्रमाणे पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात नीति समिती आवश्यक आहे. नीति समितीत विविध विभागांचे विभागप्रमुख, तज्ज्ञ डॉक्टर्स, वकील, नीति समिती अध्यक्ष, औषधशास्त्र तज्ज्ञ, सामाजिक शास्त्रज्ज्ञ इ. सर्व अभ्यागतांची उपस्थिती आवश्यक तथा बंधनकारक असते. मा.महासंचालक, आरोग्य सेवा, केंद्रीय औषध मानंक नियंत्रण संस्था, नवी दिल्ली, यांचेकडील नोंदणी क्रमांक ECR/1236/Inst/MH/2019, दिनांक ०४ जुलै, २०१९, अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अंतर्गत पदव्युत्तर संस्थेच्या नीति समितीस परवानगी मिळालेली आहे. नीति समितीत १० सदस्यांची नेमणूक करण्यात आली असून केंद्र शासनाच्या मानंकानुसार किमान ५ सदस्य बाहेरील आहेत. नजीकच्या भविष्यकाळात यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात विविध कंपन्यांनी प्रायोजित केलेले अथवा सरकारी संस्थांचे संशोधन/शोध प्रकल्प राबविण्यात येतील, पदव्युत्तर संस्थेत काम करणारे प्राध्यापक त्यांच्या बढतीकरिता विविध संशोधन प्रकल्प हाती घेतील. वर नमूद केलेले सर्व शोध प्रकल्पांचे काम सुरू करण्यापूर्वी व शोधनिबंध वैद्यकीय नियतकालिकेत प्रसिध्द करण्यापूर्वी नीति समितीची परवानगी घेणे आवश्यक असते. वरील सर्व विषय नीति समितीच्या बैठकीत सर्व सदस्यांसमोर सादर करणे आवश्यक असते. आजपर्यंत नीति समितीच्या दोन बैठका पार पडल्या आहेत. भविष्यकाळात बैठकांची संख्या वर्षातून ५ ते ६ वेळा होऊ शकते. भविष्यकाळात यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात राबविण्यात येणा-या विविध संशोधन/शोध प्रकल्पांतून महापालिकेस आरोग्य संशोधन प्रकल्प प्रक्रीया सुरू करण्यासाठी उपयोग होऊन, मनपाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याबरोबर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावलौकीकात भर पडेल. त्याअनुषंगाने नीति समितीच्या सभेस उपस्थित राहणाऱ्या सदस्यांना मानधन व प्रवासखर्च देणे आवश्यक असल्याने, नीति समिती अध्यक्ष व सचिव यांना प्रत्येक सभेसाठी र.रू.३,०००/- (अक्षरी र.रू.तीन हजार फक्त) व इतर सदस्य यांना प्रत्येक सभेसाठी र.रू.१,५००/- (अक्षरी र.रू.एक हजार पाचशे फक्त) याप्रमाणे मानधन तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ०३ मार्च, २०१० नमुद केले नुसार किलोमीटर भत्ता(मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४१४(१) आणि(२) दिनांक ०४ डिसेंबर, १९९९ अन्वये नमुद केले आहे. त्याप्रमाणे म.न.पा. हद्दीबाहेर वास्तव्यास असणा-या नीति समितीच्या सदस्यास प्रत्येक सभेसाठी प्रवास भत्ता दर(पेट्रोल) र.रू.९/- (अक्षरी र.रू.नऊ फक्त) प्रती किलोमीटर व डिझेलसाठी दर र.रू.७/- (अक्षरी र. रू. सात) प्रती किलोमीटर याप्रमाणे प्रवास खर्च देणे आवश्यक आहे.सबब, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय पदव्युत्तर संस्थेच्या नीति समितीच्या अध्यक्ष व सचिव यांना मानधन र.रू.३०००/- (अक्षरी र. रू. तीन हजार फक्त) प्रत्येक नीति समितीच्या सभेसाठी व इतर सदस्यांस प्रत्येक सभेसाठी मानधन र.रू.१,५००/- (अक्षरी र.रू.एक हजार पाचशे फक्त) व मनपा हद्दीबाहेरील वास्तव्य असणा-या नीति समितीच्या सदस्यास प्रत्येक सभेसाठी प्रवास भत्ता दर(पेट्रोल) र.रू.९/- (अक्षरी र.रू.नऊ फक्त) प्रती किलोमीटर व डिझेलसाठी दर र.रू.७/- (अक्षरी र.रू.सात) प्रती किलोमीटर याप्रमाणे प्रवासखर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४५ विषय क्रमांक – ०८
दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – ड क्षेत्रिय, पाणीपुरवठा
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ - मा.अति.आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.पापु/डक्षे/१तां/कावि/०९/२०२१ दि.०१/०३/२०२१

मा.अति.आयुक्तत(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांनी शिवछत्रपती क्रीडासंकुलातील सर्व वसतिगृहे, बॅडमिंटन हॉल, बॉक्सिंग हॉल येथील सुविधा कोविड १९ विषाणुचा व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व संस्थात्मक विलगीकरणासाठी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. शिवछत्रपती क्रीडासंकुलातील विविध बाबी व दैनंदिन देखभालीसाठी क्रीडा संकुलाच्या उत्पन्नातून खर्च होत असतो, तथापि मार्च २०२० पासून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न क्रीडासंकुलामध्ये प्राप्त झालेले नाही तसेच शासन अनुदानाची रक्कम देखील अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही असे कळविलेले आहे. तसेच शिवछत्रपती क्रीडासंकुलात कोविड केअर सेंटर उभारले असल्याने व क्रीडा संकुलातील कोणत्याही सुविधेचा आता वापर होत नसल्याने पाणी देयक माफ करण्याबाबत कृपया सहकार्य करावे अशी विनंती केलेली आहे. शिवछत्रपती क्रीडासंकुलात कोविड केअर सेंटर सुरु केल्याच्या दिनांकपासूनचे प्रतिदिन ४५० लिटर/बेड प्रमाणे पाणीपट्टी बिल माफ करणेस या विभागाची हरकत नाही.तसेच विषयांकित मिळकतीसह इतर खाजगी मिळकतीही महानगरपालिकेसकोविड १९ विषाणूचा व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व संस्थात्मक विलगीकरणासाठी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

| अ.क्र. | खाजगी मिळकतीचे नाव | मनपामार्फत Covid care centers उभारल्याचा दिनांक | बेडची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आकुर्डी से.क्र. २६ आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ | १६/०५/२०२० | ३०३ | |
| २ | रिजनल टेलिकॉम सेंटर, शाहुनगर, चिंचवड, पुणे-१९ | २७/६/२०२० | १२० | |
| ३ | राघव मंगल कार्यालय, दिघीगाव, पुणे | १५/८/२०२० | ३०० | |
| ४ | बालाजी कॉलेज रावेत औंध बी.आर.टी.एस. ताथवडे | १९/०६/२०२० | २३० | कोव्हीड सेंटरसाठी तात्पुरत्या स्वरुपात ४” नळ कनेक्शन दिलेले आहे. |
| ५ | शिव छत्रपती क्रिडा संकुल महाळुंगे-बालेवाडी | १३/०५/२०२० | २३५ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित केंद्र |
| ६ | डि.वाय. पाटील कॉलेज, रावेत | २६/०६/२०२० | ८५ | |
| ७ | खाजगी कोव्हीड सेंटर मंत्रा मोमेंट समोर गट नं.१७०, मोशी | १५/०८/२०२० | १०० | |
| ८ | ऑटो क्लस्टर, चिंचवड | २८/०८/२०२० | २१२ | |

वरील तक्त्यातील सर्व मिळकतीस कोविड केअर सेंटर सुरु केल्याच्या दिनांकापासुन ते कोविड केअर सेंटर बंद केलेच्या दिनांकापर्यंत प्रतिदिन ४५० लिटर/बेड प्रमाणे पाणीपट्टी बिल माफ करणेस

आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वरील तक्त्यातील सर्व मिळकतीस कोविड केअर सेंटर सुरु केल्याच्या दिनांकापासुन ते कोविड केअर सेंटर बंद केलेच्या दिनांकापर्यंत प्रतिदिन ४५० लिटर/बेड प्रमाणे पाणीपट्टी बिल माफ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४६ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ - मा.कार्यकारी अभियंता, विद्युत यांचेकडील पत्र क्र.बक्षे/लेखा/५/कावि/१३९/२०२१ दि.०१/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता, विद्युत यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विदयुत विभाग ब क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ५) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे अटीस अधिन राहून संबधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचा आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४७ विषय क्रमांक – १०

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – पाणीपुरठा प्रकल्प

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भा.आ./पापु प्रकल्प/अ-२/५५/२०२१, दि.०२/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहराकरिता भामा आसखेड धरणातून ६०.७९ द.ल.घ.मी. पाणी पुनःआरक्षित करणेस शासन निर्णय क्र.बि.सिं.आ/२०१८/(३९१/१८)/सिं.व्य(धो) दि.२४/१०/२०१८ व शासन शुद्धीपत्रक क्र. बि.सिं.आ./२०१८/(३९१/१८)/सिं.व्य. (धो) दि.१३/११/२०१८ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपास इरादापत्र जा.क्र./चापावि/बिसिं/प्रशासिं-१/१५७९/सन २०१९ दि.३०/०३/२०१९ व ज्ञापन पत्र जा.क्र.मुअ(जसं)/(४४/२०१८)/प्रशा-८/क्र.००१११ दि.७/०१/२०१९ प्राप्त झालेले आहे. सदर ज्ञापनातील सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यानुसार भामा आसखेड बिगर सिंचन ६०.७९ द.ल.घ.मी पाणी आरक्षणापोटी सिंचन पुनर्स्थापना खर्च शासनास भरणे आवश्यक आहे. उपकार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे यांनी त्यांचे सुधारीत इरादापत्र जा.क्र./चापावि/प्रशा-सिं-१/३२६३/२०२० दि. १९/१०/२०२० रोजी दिले असून त्यानुसार सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी र.रु.२०८.६५ कोटी (१०२७८.२३ X २.०३ = २०८६५ लक्ष) रक्कम महानगरपालिकेस भरणे बंधनकारक आहे. सदरची रक्कम सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून समान पाच हप्त्यात भरणे बंधनकारक आहे असे कळविलेले आहे. महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शुद्धीपत्रक क्र.बि.सिं.आ./२०१८/

(३९१/१८)/सिं.व्य.(धो-२) दि.२८/०१/२०२१ नुसार सिंचन पुनर्स्थापना खर्चासाठी पुढील नमूदप्रमाणे शुद्धीपत्रक काढण्यात आले आहे "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा एकुण परिगणित सिंचन पुनर्स्थापनेच्या खर्चा पैकी भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांसाठीचा पुनर्वसन खर्च वजा जाता उर्वरित रक्कम सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च म्हणुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून घेण्यात यावी. महानगरपालिकेस उक्त रक्कम एक रक्कमी भरणे बंधनकारक करण्याऐवजी ती सन २०२०-२१ पासुन ५ वर्षात टप्प्याटप्प्याने समान वार्षिक हप्त्यात स्वीकारावी. " असा निर्णय शासनामार्फत प्रसिद्ध करणेत आला आहे. भामा आसखेड एकूण बिगर सिंचन पुनर्स्थापना खर्च र.रु.२०८.६५ कोटी मधून महानगरपालिकेमार्फत अदा करणेत आलेला एकूण पुनर्वसन खर्च र.रु.३०.८७ कोटी वजा जाता उर्वरित र.रु.१७७.७८ कोटी रक्कम सन २०२०-२१ पासून पुढे समान ५ हप्त्यात र.रु.३५,५५,६०,०००/- इतकी रक्कम अदा करणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकात “पाणीपुरवठा विशेष योजना निधी" पान क्र. २३८ वर अ.क्र.१ "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक स्त्रोत (Source) निश्चित करणे, त्यातील पाणी साठा आरक्षित करणे व तदनुषंगिक कामे करणे”याकामाअंतर्गत र.रु.५०.०० कोटी तरतूद उपलब्ध आहे. सदरची तरतूद मधून खर्च करणेत आला असून उपलब्ध तरतूद पुरेशी नाही, त्यामुळे सन २०२०-२१ च्या सुधारीत अंदाजपत्रकात तरतूद र.रु. ९९.५० कोटी प्रस्तावित करण्यात आली आहे. तरी भामा आसखेड धरणातून ६०.७९ द.ल.घ.मी. बिगर सिंचन पाणी आरक्षणापोटी सिंचन पुनर्स्थापना खर्चाचा पहिला हप्ता (सन २०२०-२१ साठी) र.रु.३५,५५,६०,०००/- (अक्षरी र.रू.पस्तीस कोटी पंचावन्न लाख साठ हजार फक्त) कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे-१ यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४८ विषय क्रमांक – ११

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – पाणीपुरठा प्रकल्प

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भा.आ./पापु प्रकल्प/अ-२/५३/२०२१, दि.०२/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहराकरिता आंद्रा धरणातून ३६.८७ द.ल.घ.मी. पाणी पुनःआरक्षित करणेस शासन निर्णय क्र.बि.सिं.आ/२०१८/(३९१/१८)/सिं.व्य(धो) दि.२४/१०/२०१८ व शासन शुद्धीपत्रक क्र. बि.सिं.आ./२०१८/(३९१/१८)/सिं.व्य. (धो) दि.१३/११/२०१८ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपास इरादापत्र जा.क्र./पुपावि/प्रशा-१/बि.सिं./पिंचिंमनपा/इरादापत्र/३४७/सन २०१८ दि.१८/०१/२०२० व ज्ञापन पत्र जा.क्र.मुअ(जसं)/(४४/२०१८)/प्रशा-८/क्र.००१११ दि.७/०१/२०१९ प्राप्त झालेले आहे. सदर ज्ञापनातील सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यानुसार आंद्रा बिगर सिंचन ३६.८७ द.ल.घ.मी. बिगर सिंचन पाणी आरक्षणापोटी सिंचन पुनर्स्थापना खर्च शासनास भरणे आवश्यक आहे. उपकार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांनी त्यांचे इरादापत्र जा.क्र./पुपावि/प्रशा-१/बि.सिं./पिंचिंमनपा/इरादापत्र/३४७/सन२०१८ दि. १८/०१/२०२० रोजी दिले असून त्यानुसार सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी र.रु.१००,८०,२५,८५६/- पैकी (शासन निर्णयातील अ.क्र.६ आणि

प्रदेश कार्यालयाचे ज्ञापन नुसार महानगरपालिकेस सिंचन पुनर्स्थापना खर्च एकरक्कमी भरणे बंधनकारक करणे ऐवजी सन २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षात टप्प्याटप्प्याने घेण्यात यावा अशा सूचना असल्यामुळे) पहिला हप्ता सन २०१८-१९ साठीच्या बिगर सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी र.रु.२०,१६,०५,१७२/- तसेच दोन महिन्याची पाणीपट्टी अनामत र.रु.२०,३३,४०५/- व जलमापन यंत्रासाठी र.रु.२,००,०००/- ची अनामत रक्कम असे एकुण अनामत र.रु.२२,३३,४०५/- चे धनाकर्ष पाटबंधारे विभागाकडे दिनांक ३१/०३/२०१९ रोजी जमा करणेत आलेले आहे. तसेच दुसरा हप्ता सन २०१९-२० साठी बिगर सिंचन पुनर्स्थापना खर्चापोटी र.रु.२०,१६,०५,१७२/- चे धनाकर्ष पाटबंधारे विभागाकडे दिनांक ५/०६/२०२० रोजी जमा करणेत आलेले आहे. याअनुषंगाने सन २०२०-२१ साठी बिगर सिंचन पुनर्स्थापना खर्चाचा तिसरा हप्ता भरणा करणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकात “पाणीपुरवठा विशेष योजना निधी" पान क्र.२३८ वर अ.क्र.१ "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक स्त्रोत (Source) निश्चित करणे, त्यातील पाणी साठा आरक्षित करणे व तदनुषंगिक कामे करणे” याकामाअंतर्गत र.रु.५०.०० कोटी तरतूद उपलब्ध आहे. सदरची तरतूद मधून खर्च करणेत आला असून उपलब्ध तरतूद पुरेशी नाही, त्यामुळे सन २०२०-२१ च्या सुधारीत अंदाजपत्रकात तरतूद र.रु.९९.५० कोटी प्रस्तावित करण्यात आली आहे. तरी आंद्रा धरणातून ३६.८७ द.ल.घ.मी. बिगर सिंचन पाणी आरक्षणापोटी सिंचन पुनर्स्थापना खर्चाचा तिसरा हप्ता (सन २०२०-२१ साठी) र.रु.२०,१६,०५,१७२/- (अक्षरी र.रू.वीस कोटी सोळा लाख पाच हजार एकशे बाहत्तर फक्त) कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे-०१ यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९४९ विषय क्रमांक – १२

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – वैद्यकीय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.वैद्य/९/कावि/७६४/२०२१, दि.०१/०३/२०२१

मा.अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ११ सप्टेंबर, २०२० चे पत्र व शासन निर्णय क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.३९१/आरोग्य-५ दिनांक: १२ सप्टेंबर, २०२० अन्वये संपुर्ण राज्यात कोविड प्रादुर्भावावर नियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी सर्व लोकसंख्येला भेटी देऊन आरोग्य शिक्षण, महत्त्वाचे आरोग्य संदेश, संशयीत कोविड रुग्ण शोधणे तसेच मधुमेह, हृदयविकार, किडनी आजार, लठ्ठपणा यासारख्या महत्त्वाच्या Co-morbid condition असणा-या व्यक्ती शोधून काढणे, त्याचप्रमाणे बालकांचे लसीकरण व गरोदर मातांवर वेळीच उपचार याचा अंतर्भाव करुन “माझे कुटुंब– माझी जबाबदारी” ही मोहिम दि.१५/०९/२०२० ते १० ऑक्टोंबर २०२० – पहिली फेरी व १२ ऑक्टोंबर २०२० ते २४ ऑक्टोंबर २०२०- दुसरी फेरी या कालावधीत राबविणेकरीता सुचना केलेल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये “माझे कुटुंब–माझी जबाबदारी” मोहिम दि.१५/०९/२०२० ते दि.२५/१०/२०२० (दोन फे-यांचा कालवधी) या कालावधीत पहिली फेरी दि.१५/०९/२०२० ते दि.१०/१०/२०२० असे १५ दिवस व

दुसरी फेरी दि.१४/१०/२०२० ते २४/१०/२०२० असे १० दिवसामध्ये राबविण्यात येत आहे. सदर मोहिमेची माहिती पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना होणेकामी जनजागृती करणे आवश्यक आहे. “माझे कुटुंब – माझी जबाबदारी” मोहिम जनजागृती पिंपरी चिंचवड शहरात ०५ दिवस भोंग्याव्दारे म.न.पा.चे ८ रुग्णालयाचे परिसरात करणेकामी दि.२६/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० या ०५ दिवस जनजागृती करणेकामी जेष्ठ वैद्यकिय अधिकारी रुग्णालय यांचे नावे अगाऊ रक्कम अदा करण्यात आलेली होती. सदर अगाऊ रकमेतून करण्यात आलेला खर्चाचा प्रस्तावात नमूद प्रमाणे कोरोना माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेची जनजागृती करणेकामी काढण्यात आलेली अगाऊ र.रु.१,७५,०००/- खर्च संपुर्णतः खर्च झालेला असुन र.रु. निरंक शिल्लक आहेत. त्यामुळे अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे काढण्यात आलेल्या र.रु.१,७५,०००/-(अक्षरी रु.एक लाख पंचेहत्तर हजार फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९५०
विषय क्रमांक – १३
दिनांक – १०/०३/२०२१
विभाग – पाणीपुरठा प्रकल्प
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे
अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ- मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.शिमं/कावि/९अ/३४/२०२१, दि.०२/०३/२०२१

मा.प्रशासन अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील मा.प्रशासन अधिकारी यांचे वापरातील वाहन क्र.एमएच १४ सीएल ०२५६ या वाहनाचे टायर बदलणेकामी कार्यशाळेने अभिप्राय दि.०२.१२.२०२० रोजी दिलेला आहे. मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.मभां/१८/कावि /१७/२०१२ दि.०५.११.२०१२ अन्वये M/S.CEAT LIMITED PUNE 412308 यांचेकडून सदर साईजचे टायर खरेदीकामी प्रोफोर्मा इनव्हाईस दरपत्रक प्राप्त करून घेण्यात आलेले आहे तसेच त्यानी टायर उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे.M/S.CEAT LIMITED PUNE 412308 यांचे प्रोफोर्मा इनव्हाईस क्र.२२० दि.०६.०२.२१ नुसार ४ नग टायरची रक्कम रूपये २०,२०५/- इतकी कळविलेली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील अधिकृत विक्रेतेकडून दरपत्रक मागविणेत आले असून त्यानुसार मे.श्री.नारायण टायर्स अण्ड सर्विसेस यांचे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. प्रति टायर दर र.रू.३,१३०/- प्रमाणे चार टायर्सचे १२,५२०/- व जीएसटी कर १४ टक्के प्रमाणे एकूण र.रू.१६,०२६/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी मा. प्रशासन अधिकारी यांचे वापरातील वाहन क्र.एमएच १४ सीएल ०२५६ या वाहनाचे टायर बदलणेकामी र.रू.१६,०२६/- (अक्षरी र.रू.सोळा हजार सव्वीस फक्त) येणा-या आगाऊ थेट खर्चास तसेच येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९५१ विषय क्रमांक – १४

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – आकाशचिन्ह परवाना

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ - मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.आप/७/कावि/६७/२०२१, दि.१६/०२/२०२१

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषय - मनपा क्षेत्रातील विद्युत पोलवर क्युऑक्स (kiosk) जाहिरातीचे हक्क देणेबाबत..

विषय क्रमांक १४ चा विचार दिनांक २४/०३/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९५२ विषय क्रमांक – १५

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – फ क्षेत्रीय

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/नि-४/कावि/१६०/२०२१, दि.०३/०३/२०२१

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 17) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९५३ विषय क्रमांक – १६

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – वायसीएमएच पी.जी.

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.YCMH/८/कावि/२७५/२०२१,दि.२६/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये प्रथम वर्ष ३६ व द्वितीय वर्ष २३ असे एकुण ५९ पी.जी. विद्यार्थी कार्यरत आहेत. सदर पी.जी. विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासन निर्णयानुसार राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शासकिय दंत महाविद्यालये आणि शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी (कनिष्ट निवासी १/२/३ व वरिष्ठ निवासी १/२/३) यांचे विद्यावेतनात दिनांक १ मे २०२० पासून प्रतिमाह रुपये १०,०००/-(अक्षरी र.रु.दहा हजार फक्त) इतकी ठोक वाढ लागू करण्यास शासनाची मान्यता प्रदान करणेत आलेली आहे. शासन निर्णयानुसार महागाई भत्ता वाढ व शासनाकडुन विद्यावेतनात होणारी वाढ विचारात घेऊन अदा करण्यास व सदरचा खर्च पी.जी.आय.वायसीएमएच, पदव्युत्तर निवासी विद्यार्थी विद्यावेतन या लेखाशिर्षातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९५४ विषय क्रमांक – १७

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.विमुका/६/कावि/२९०/२०२१, दि.०१/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.27/1-2020/21 अन्वये प्र.क्र.2 बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे या कामात विद्युत विषयक कामे करणेकामी मे.टेक्नोवा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा लि नि.र.रू.26,78,418/- (अक्षरी र.रू.सव्वीस लाख अठठयाहत्तर हजार चारशे अठरा रुपये फक्त) पेक्षा 15.13% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९५५ विषय क्रमांक – १८

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.विमुका/६/कावि/२८९/२०२१, दि.०१/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.27/2-2020/21 अन्वये प्र.क्र.2 जाधववाडी येथील नव्याने होणा-या शाळेचे विद्युतीकरण करणे व इतर विद्युत विषयक कामे करणेकामी मे.टेक्नोवा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा लि नि.र.रू.26,69,378/- (अक्षरी र.रू. सव्वीस लाख एकोणसत्तर हजार तिनशे अठठयाहत्तर फक्त) पेक्षा 14.15% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९५६ विषय क्रमांक – १९

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – मुख्य लेखापरिक्षण

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/१/कावि/६१/२०२१, दि.०३/०३/२०२१

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक –८९५७ विषय क्रमांक – २०

दिनांक –१०/०३/२०२१ विभाग – ब क्षेत्रीय आरोग्य

सुचक –मा.अभिषेक बारणे अनुमोदक –मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षेआ/५/कावि/९४/२०२१, दि.०२/०३/२०२१

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगपालिका ब क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत औष्णीक धुरीकरण बाबत निविदा नोटीस क्र.1/2019-20 अन्वये प्रसिध्द करुन दर मागविणेत आलेले आहे. मे.मनिष असोसिएटस यांचे प्रति टॅम्पो भाडे प्रति दिन र.रु.837/- स्विकृत करणेत आलेला आहे. स्थायी समिती ठराव क्र.5488 दि.11/09/2019 नुसार संस्थेनी कामाचा सिलबंद करारनामा सादर केल्यानुसार दि.01/09/2019 ते दि.31/08/2020 पर्यतचा आदेश क्र. बक्षेआ/5/कावि/330/2019 दि.11/09/2019 अन्वये कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. कामाची मुदत दि.31/08/2020 रोजी संपलेने दि.01/09/2020 तेदि.30/11/2020 पर्यंतच्या खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.7463 दि.16/09/2020 नुसार संस्थेनी कामाचा सिलबंद करारनामा सादर केल्यानुसार आदेश क्र.बक्षेआ/5/कावि/379/2020 दि.26/10/2019 अन्वये दि.01/09/2020 ते दि.30/11/2020 पर्यंतचा कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. मे.मनिष असोसिएटस यांचेकडुन औष्णीक धुरीकरणासाठी रिक्षा टेम्पो भाड्याने घेणेसाठी चे कामाची मुदत 31/11/2020 रोजी संपलेने व नवीन निविदेचा आदेश दि. 01/03/2021 पासुन २ वर्षासाठी देणेत आलेला असल्याने दि.01/12/2020 ते दि.28/02/2021 पर्यंत मुदतवाढ देणेसाठी अपेक्षीत खर्चास व मुदतवाढीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक –८९५८ विषय क्रमांक – २१

दिनांक –१०/०३/२०२१ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक –मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक –मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/१६/कावि/८६/२०२१, दि.०३/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव/ संक्रमण रोखण्यासाठी करणेत येत असलेल्या उपाययोजना भाग म्हणून महानगरपालिकेचे विविध मनपा दवाखाने, क्षेत्रिय कार्यालये, कोरोना लसीकरण केंद्र, इ. ठिकाणचे कामकाजाची आवश्यकता व तातडी लक्षात घेवून रुग्णालयांमार्फत देण्यात येणा-या अत्यावश्यक सेवेत तसेच कामकाजात अडथळा येऊ नये यासाठी विशेष बाब म्हणून क्र.मातंवि/१६/कावि/८४/२०२१ दिनांक ०२/०३/२०२१ अन्वये यापुर्वी मानधनावर नियुक्त केलेल्या सध्यस्थितीत कार्यरत प्रपत्र-अ मधील नमुद एकूण ३७ डेटा एन्ट्री ऑपरेटर कर्मचारी यांना यापुर्वीचे दरमहा एकत्रित मानधन र.रु.१९,२५०/- या दरानुसार सेवा संपुष्टात आलेनंतर ०१ दिवसाकरीता सेवा पुर्णत:खंडीत करुन दि.०१/०५/२०२१ अखेर मुदतवाढ देणेस व त्याकामी येणारा प्रत्यक्ष खर्च मनपाचे “कोरोना निधी”या लेखाशिर्षामधून अदा करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९५९ विषय क्रमांक – २२

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – दुरसंचार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.दुसं/आस्था/कावि/१५८/२०२१, दि.०२/०३/२०२१

मा.अति. आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

अणुविदयुत व दूरसंचार विभागाचे महसुली अंदाजपत्रकातील सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ /घट करणे आवश्यक आहे.

| पान क्र.<br><br>**अ.क्र** | **उपलेखाशिर्षाचे नाव** | **सन २०२०–२१ तील तरतुद** | **घट** | **वाढ** | **एकुण तरतुद** |
|---|---|---|---|---|---|
| पान क्र.१९२–१९३ अ.क्र ४७ (२१०) ४ | स्थायी आस्थापना | २,५०,००,००० | ० | ६,५८,००० | २,५६,५८,००० |
| १९४-१९५ अ.क्र ४७ (२२०) ७ | संचार मंत्रालयाची परवाना नुतनीकरण फी अदा करणे. | १०,००,००० | ६,५८,००० | ० | ३,४२,००० |

उपरोक्त प्रमाणे महसुली अंदाजपत्रकातील तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९६० विषय क्रमांक – २३

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – आकाशचिन्ह परवाना

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.आप/७/कावि/८०/२०२१, दि.०४/०३/२०२१

विषय - महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनाधिकृत होर्डीग्ज जाहिरात फलक यांचे सर्वेक्षण करुन सदरचे फलक स्ट्रक्चरसह स्वखर्चाने काढणे व मनपा हिस्सा जमा करणेकामी एजन्सी नेमणेबाबत...

विषय क्रमांक २३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९६१ विषय क्रमांक – २४

दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/११/कावि/८०/२०२१, दि.०४/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा सूचना क्रमांक ०७/२०२०-२१ नुसार लघुत्तम निविदा धारक मे. टेक नाईन सर्व्हिसेस यांना सारथी हेल्पलाईनकरिता कॉल ऑपरेटर नियुक्त करणे व सारथी हेल्पलाईन संगणक प्रणाली देखभाल दुरुस्ती करणेचे कामकाज देण्यास तसेच त्यांचेसोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या र.रू. ३१,२५,४६१/- अधिक वस्तु व सेवा कर अंदाजपत्रकीय दरापेक्षा - ८.७६% ने कमी चे दरास व त्या अनुशंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८९६२ विषय क्रमांक – २५
दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – ब क्षेत्रीय
सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ –मा.कार्यकारी अभियंता यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/५अ/कावि/२०७/२०२१, दि.०३/०३/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (१ ते २४) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८९६३ विषय क्रमांक – २६
दिनांक – १०/०३/२०२१ विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/BRTS/३३५/२०२१, दि.०४/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

